श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी,
संचालित

# कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी.

## सूचना

वार: शुक्रवार　　　　　　　　　　　　　　　　　　दिनांक: २१/११/२०२५

महाविद्यालयातील बी.एड., बी.पी.एड., एम.एड. व एम.पी.एड. विभागातील सर्व प्रशिक्षणार्थी, विभाग प्रमुख, प्राध्यापक व कार्यालयीन कर्मचारी यांना सूचित करण्यात येते की, **कर्मवीर डॉक्टर मामासाहेब जगदाळे** यांच्या १२३ व्या जयंतीनिमित्त महाविद्यालयाच्या कर्मवीर क्रीडा संकुलातील कर्मवीर इनडोअर हॉल मध्ये **दि. २३ नोव्हेंबर २०२५** रोजी आपल्या संस्थेच्या शाखांतर्गत **'कर्मवीर कुस्ती स्पर्धांचे'** आयोजन करण्यात आले आहे. सदर स्पर्धेचा उदघाटन कार्यक्रम सकाळी ठीक १०:०० वा. आयोजित करण्यात आला आहे. सदर कार्यक्रमास सर्वांनी वेळेत उपस्थित राहावे.

(कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी, जि. सोलापूर)

Shuhan
**प्रभारी प्राचार्य**
कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी
जि. सोलापूर ४१३४११

# SHRI SHIVAJI SHIKSHAN PRASARAK MANDAL, BARSHI

## College of Education, Barshi

## Notice

**Day:** Friday　　　　　　　　　　　　　　　　　　**Date:** 21/11/2025

All student-teachers, Heads of Departments, faculty members, and non-teaching staff of the B.Ed., B.P.Ed., M.Ed., and M.P.Ed. programmes are hereby informed that, on the occasion of the **123rd Birth Anniversary of Karmaveer Dr. Mamasaheb Jagdale**, **Karmaveer Wrestling Competitions** have been organized on **23 November 2025** at the **Karmaveer Indoor Hall, Karmaveer Sports Complex** of the College for the branches of our institution.

The inaugural ceremony of the competition has been scheduled at **10:00 a.m.** All concerned are requested to be present at the venue on time and grace the occasion with their participation.

College of Education, Barshi · Dist. Solapur 413 411

Shuhan
**I/C Principal**
College of Education, Barshi
Dist. Solapur 413 411

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचालित

# कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२३ व्या जयंती निमित्त

आयोजित

## कर्मवीर कुस्ती स्पर्धा

अहवाल

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी यांच्या वतीने आयोजित कर्मवीर कुस्ती स्पर्धा रविवार, दिनांक २३ नोव्हेंबर २०२५ रोजी उत्साहपूर्ण आणि शिस्तबद्ध वातावरणात संपन्न झाली.कर्मवीर कुस्ती स्पर्धेचे उद्घाटन संस्थेचे खजिनदार मा. श्री जयकुमार सी. शितोळे (बापू) यांच्या शुभहस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांची ओळख स्पर्धा सचिव सहा. प्रा. डॉ. सुभाष मारकड यांनी करून दिली.या प्रसंगी प्रमुख पाहुणे मा. श्री जयकुमार शितोळे (बापू) यांनी उपस्थित कुस्तीगीरांना मार्गदर्शन करताना कुस्ती हा सर्वांग सुंदर व्यायाम असलेला खेळ असून संस्थेचे संस्थापक कर्मवीर डॉ . मामासाहेब जगदाळे यांची कुस्तीविषयक परंपरा आणि दृष्टी आजही पुढे नेण्याची आवश्यकता असल्याचे नमूद केले. तसेच, आधुनिक युगात खेळामध्ये होत असलेले बदल, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर झळकणारे खेळाडू याविषयी बौद्धिक ज्ञान असणे खेळाडूंसाठी अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. विविध शाखांतील शारीरिक शिक्षण शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या ज्ञानवृद्धीसाठी विशेष प्रयत्न करावेत, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ. विष्णू शिखरे यांनी प्रमुख पाहुणे, सर्व उपस्थित खेळाडू, मार्गदर्शक शिक्षक , पालक यांचे मनःपूर्वक स्वागत केले. तसेच, ही स्पर्धा आयोजित करण्याची संधी मिळाल्याबद्दल संस्थेचे आभार मानले. उद्घाटन कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन महाविद्यालयातील सहा. प्रा. श्री स्वप्निल अंधारे यांनी प्रभावीपणे मांडले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी एम.पी.एड. विभागप्रमुख प्रा. डॉ. सुरेश लांडगे, बी.पी.एड. विभागप्रमुख प्रा. डॉ. अनिल कांबळे, स्पर्धा सचिव सहा. प्रा. डॉ. सुभाष मारकड, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व सर्व शिक्षकेतर कर्मचारी विशेषतः श्री आप्पा गायकवाड यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. विशेष म्हणजे, बी.पी.एड. आणि एम पी एड विभागातील विद्यार्थी यांनी परिश्रमपूर्वक कार्य करत स्पर्धेचे सुयोग्य नियोजन व अंमलबजावणी केली.या कुस्ती स्पर्धेमध्ये जुनियर कर्मवीर केसरी म्हणून महाराष्ट्र विद्यालय बार्शी चा विद्यार्थी ओम महादेव यादव आणि सिनियर कर्मवीर केसरी म्हणून श्री शिवाजी महाविद्यालय बार्शी चा विद्यार्थी श्री सागर मधुकर खराडे यांना हे किताब देऊन कुस्तीपटूंना गौरविण्यात आले. तसेच मुलींनी देखील कुस्ती स्पर्धेमध्ये सक्रिय सहभाग नोंदवला. एकूणच, कर्मवीर कुस्ती स्पर्धा २०२५ अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात, उत्तम शिस्त व समन्वयात पार पडली आणि कुस्ती खेळाच्या परंपरेला उजाळा देणारी ठरली. दिवसभरातील या कुस्ती स्पर्धेचे सूत्रसंचालन महाविद्यालयाचे सहा.प्रा. डॉ. पंकज नरळे यांनी केले तर पंच म्हणून बी.पी.एड. प्रशिक्षणार्थी श्री ज्ञानेश्वर हांडे तसेच सहाय्यक पंच म्हणून श्री. अनिकेत गोसावी, श्री निखील कुरडे, श्री अक्षय पाटील, श्री आदित्य पाटील यांनी काम पाहिले.

I/C. Principal
College of Education, Barshi
Dist. Solapur 413411

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

Organized

# Karmaveer Wrestling Competition

## Report

The *Karmaveer Wrestling Competition*, organized by the College of Education, Barshi, under the management of *Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal, Barshi*, was conducted with enthusiasm and discipline on **Sunday, 23 November 2025**.

**Inauguration Ceremony**

The competition was inaugurated at the hands of **Mr. Jaykumar C. Shitole (Bapu)**, Treasurer of the parent institute. The introductory remarks and the introduction of the chief guests were gracefully delivered by **Assistant Professor Dr. Subhash Markad**, Secretary of the competition.

While addressing the wrestlers, the chief guest **Mr. Jaykumar Shitole (Bapu)** emphasized that wrestling is a complete and holistic form of physical exercise. He highlighted the rich wrestling tradition established by the institution's founder, **Karmaveer Dr. Mamasaheb Jagdale**, and stressed the need to carry this legacy forward with pride and commitment. He also pointed out that in today's modern era, players must remain aware of the evolving trends in sports and the achievements of national and international athletes. He urged physical education teachers from various schools to make special efforts to enhance the knowledge and skills of their students.

**Presidential Address**

The president of the inauguration ceremony, **Dr. Vishnu Shikhare**, In-charge Principal of the College of Education, warmly welcomed the chief guest, all participating wrestlers, teachers, and parents. He expressed gratitude towards the management for providing the opportunity to host such a prestigious wrestling competition. The vote of thanks for the inauguration was presented effectively by **Assistant Professor Mr. Swapnil Andhare**.

**Event Execution**

The success of the event was ensured through the dedicated efforts of:

- **Dr. Suresh Landge**, Head, M.P.Ed. Department
- **Dr. Anil Kamble**, Head, B.P.Ed. Department
- **Assistant Professor Dr. Subhash Markad**, Competition Secretary
- All teaching and non-teaching staff of the college
- Special contributions by **Mr. Appa Gaikwad**

The students of the **B.P.Ed. and M.P.Ed. departments** played a major role in the smooth planning, organization, and execution of the competition through their sincere and hard work.

**Champions of the Competition**

- **Junior Karmaveer Kesari:** *Om Mahadev Yadav* – Maharashtra Vidyalaya, Barshi
- **Senior Karmaveer Kesari:** *Mr. Sagar Madhukar Kharade* – Shri Shivaji Mahavidyalaya, Barshi

Girls also participated actively, making the competition more vibrant and inclusive.

**Overall Outcome**

The **Karmaveer Wrestling Competition 2025** concluded successfully in an atmosphere marked by excellent discipline, coordination, and sportsmanship. The event proved to be a strong reflection of the proud wrestling tradition of the institution.

**Anchoring & Officiating**

- The entire day's program was anchored by **Assistant Professor Dr. Pankaj Narale**.
- Officiating was carried out by:
  - **Mr. Dnyaneshwar Hande** – Referee (B.P.Ed. Trainee)
  - **Mr. Aniket Gosavi**, **Mr. Nikhil Kurade**, **Mr. Akshay Patil**, **Mr. Aditya Patil** (All B.P.Ed. Trainee) – Assistant Referees

YouTube Link: https://youtu.be/RmaqwJNMJiU

[signature]

**I/C. Principal**
College of Education, Barshi
Dist. Solapur 413411

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचालित

# कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२३ व्या जयंती निमित्त
आयोजित

## कर्मवीर कुस्ती स्पर्धा

**कार्यक्रमाचे फोटो**




उदघाटन प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन




प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. पी. शिखरे यांच्या हस्ते प्रमुख पाहुणे मा. श्री. जयकुमार शितोळे यांचे स्वागत.

College of Education, Barshi
Dist. Solapur 413411

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचालित

# कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२३ व्या जयंती निमित्त
आयोजित

## कर्मवीर कुस्ती स्पर्धा

### कार्यक्रमाचे फोटो




उदघाटन प्रसंगी उपस्थिताना मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे मा. श्री. जयकुमार शितोळे




उदघाटन प्रसंगी उपस्थिताना मार्गदर्शन करताना कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ. व्ही. पी. शिखरे

College of Education, Barshi Dist. Solapur 413411

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचालित

# कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२३ व्या जयंती निमित्त
आयोजित

## कर्मवीर कुस्ती स्पर्धा

## कार्यक्रमाचे फोटो




सलामीची कुस्ती लावताना प्रमुख पाहुणे मा. श्री. जयकुमार शितोळे व मान्यवर



कर्मवीर केसरी अंतिम सामना सुरू करताना उपस्थित मान्यवर

College of Education, Barshi
Dist. Solapur 413411

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचालित

# कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२३ व्या जयंती निमित्त
आयोजित

## कर्मवीर कुस्ती स्पर्धा

## <u>कार्यक्रमाचे फोटो</u>




कर्मवीर केसरी जुनियर कु. ओम महादेव यादव याचा सत्कार करताना मा. श्री. जयकुमार शितोळे व मान्यवर .




कर्मवीर केसरी कु. सागर मधुकर खराडे  याचा सत्कार करताना मा. श्री. जयकुमार शितोळे व मान्यवर

College of Education, Barshi
Dist. Solapur 413 411

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचालित

# कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२३ व्या जयंती निमित्त

आयोजित

## कर्मवीर कुस्ती स्पर्धा

**कार्यक्रमाचे फोटो**




कुस्ती स्पर्धेतील विजेते व उपस्थित मान्यवर




College of Education, Barshi Dist. Solapur 413411

I/C. Principal
College of Education, Barshi
Dist. Solapur 413411

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचालित

# कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२३ व्या जयंती निमित्त
आयोजित

## कर्मवीर कुस्ती स्पर्धा

बातमी

पुढारी

News by
गणेश गोडसे, बार्शी




बार्शी : कॉलेज ऑफ एज्युकेशनतर्फे आयोजित कुस्ती स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना जयकुमार शितोळे. यावेळी उपस्थित मान्यवर.

## जगदाळेमामा जयंतीनिमित्त बार्शीत कर्मवीर कुस्ती स्पर्धा

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी या संस्थेचे संस्थापक कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२३ व्या जयंतीनिमित्त कॉलेज ऑफ एज्युकेशनच्यावतीने विविध गटातील कुस्ती स्पर्धा झाल्या.

स्पर्धेचे उद्घाटन संस्थेचे खजिनदार जयकुमार शितोळे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांची ओळख स्पर्धा सचिव डॉ. सुभाष मारकड यांनी करून दिली. उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रभारी प्राचार्य डॉ. विष्णू शिखरे यांनी सर्वांचे स्वागत केले. प्रा. स्वप्निल अंधारे यांनी आभार मानले.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी एम.पी.एड. विभागप्रमुख डॉ. सुरेश लांडगे, बी.पी.एड. विभागप्रमुख डॉ. अनिल कांबळे, स्पर्धा सचिव डॉ. सुभाष मारकड, आप्पा गायकवाड यांनी योगदान दिले.

My Solapur Edition
Nov 27, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

College of Education, Barshi
Dist. Solapur 413 411